(२)

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

फोन नं. कुलगुरू : ३५१२२
कुलसचिव : २५०६८
कुलसचिव व कार्यालय पी. बी. एक्स. २४२७१ ते २४२७५, २०५७१ ते २०५७५
परीक्षा विभाग : २४०७६

तार : युनिशिवाजी
विद्यानगर, कोल्हापूर–४१६ ००४

13 OCT 1989

संदर्भ क्र. संलग्नता/टी. २/नवीन कॉलेज/ 9193

दिनांक : ९. १०. १९८९.

प्रति,

अध्यक्ष,
हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ,
सावर्डे, जि. कोल्हापूर.

विषय : सन, १९८९–९० या वर्षात वाठार–वडगांव, जि. कोल्हापूर येथे नवीन आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करणेबाबत.
संदर्भ : शासकीय आदेश क्र. एमईडी/१६८९/२२७८/एमईडी–१ दि. १४. ९. ८९.

महाशय,

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भीय पत्राबाबत आपणास आदेशावरून कळविण्येत येते की, शासनाने आपल्या संस्थेस वाठार–वडगांव, जि. कोल्हापूर येथे सन, १९८९–९० या शैक्षणिक वर्षात नवीन आयुर्वेदिक महाविद्यालय सुरु करण्यास मान्यता दिलेली आहे.

मा. कुलगुरूंनी शिवाजी विद्यापीठ कायदा, १९७४ कलम ११[४] प्रमाणे त्याना लाभलेल्या अधिकारानुसार विद्यापीठ अधिकार मंडळाच्यावतीने आपल्या संस्थेत सदरचे महाविद्यालय सुरु करण्यास निव्वळ तात्पुरती परवानगी दिली आहे.

तरी महाविद्यालय सुरु करण्यासाठीची सर्व प्रक्रिया [उदा. विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, प्राध्यापकाची तात्पुरती नियुक्ती करणे आदी] पूर्ण करून महाविद्यालय दि. १५.११.८९ पासून सुरु करावे.

तसेच दि. १४. ९. १९८९ च्या शासकीय पत्रातील सर्व अटींचे पालन करावे.

नवीन महाविद्यालयासाठी शिवाजी विद्यापीठ कायदा, १९७४ कलम ४३[४] [५] प्रमाणे स्थानिक चौकशी समिती लवकरच नजिकच्या काळात पाठविण्येत येईल. सदरच्या स्थानिक चौकशी समितीच्या शिफारशीप्रमाणे आपल्या संस्थेच्या या महाविद्यालयास नियमित संलग्नीकरण दिल्याबाबत कळविण्येत येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

दरम्यानच्या कालावधीत सचिव, सेन्ट्रल कौन्सिल ऑफ आयुर्वेदिक मेडिसीन, नवी दिल्ली यांचेकडे प्रोजेक्ट रिपोर्ट सादर करावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी ही विनंती.

कळावे,

आपला विश्वासू,

कुलसचिव.

TRUE COPY

PRINCIPAL,
Ayurvedic Medical College
Peth Vadgaon. Tal. Hatkanangale, Dist. Kolhapur